महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | Rs.2/- | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडबिंदे

गुरुवार ❖ १२ डिसेंबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १६७ ❖ पाने - ४ | RNI NO : MAHMAR/2016/72091 | Postal Reg. No. THC/256/2022-2024

## संपादकीय

### ठेकेदार आणि अधिकाऱ्यांना मलई कसे मिळणार ग्रामीण नागरिकांना पाणी?

ग्रामीण भागातील गावा खेड्यातील, वाड्या वस्त्यातील पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी. येथील नागरिकांना स्वच्छ, पाणी पुरवठा नियमित व्हावा, पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना विशेष करून महिलांची होणारी पिळवणूक थांबावी. पिण्याच्या पाण्यासाठीची वनवण कमी थांबावी. प्रत्येक गावाला, वाडीला, पिण्याच्या पाणी पुरवठा करण्यासाठी स्वतंत्र जल स्रोत उभारावेत, यासाठी देश स्वतंत्र झाल्यापासून सरकार इमाने इतबारे प्रयत्न करत आहे.

सरकारच धोरण त्यासाठी निधी ची तरतूद होते. आवश्यक पायाभूत सुविधा म्हणून कधी कधी जागतिक बँके कडून निधी येतो. मग सरकारी धोरणानुसार नळ पाणी योजनाचा आराखडा तयार होतो. हा आराखडा तयार झाला की. याच पाणी पुरवठ्याच्या योजनाच्या नावाखाली मग तेच अधिकारी तेच ठेकेदार आपला कमाईचा मलईदार धंदा सुरु करतात. अधिकाऱ्याच्या संगणमताने मग योजना कागदोपत्री पूर्ण होते. आणि तिचे संपूर्ण खर्चाचे बिल ठेकेदार अधिकारी मस्त काढून खातात आणि मूलभूत पायाभूत सुविधा म्हणून जल स्रोत अटले, पाणी खपले म्हणत आख्खी योजना खाऊन ठेकेदार आणि अधिकारी पसार होतात. गावातील पाणी समस्या तशीच गावकरी, कष्टकरी, त्याच गावातील महिला बिचारया नेहमीच येतो पावसाळा त्या प्रमाणे प्रत्येक वर्षी पिण्याच्या पाणी समस्या ही आपली कायम समस्या मानून या समस्याशी सामना करत आहेत. हे वास्तव चित्र बदलणार कोण? आणि कधी? कुपणच शेत खातेय तिथे न्याय कोणाकडे मागणार त्यांची ही अवस्था बदलणार तरी कधी. हाच खरा प्रश्न आहे.

# खातेवाटपाचा पेच दिल्ली दरबारी



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

मुंबई : खातेवाटप आणि मंत्रीपदांच्या संख्येवरून महायुतीमध्ये पेच असून आता तो नवी दिल्लीत भाजप पक्षश्रेष्ठींबरोबर होणाऱ्या बैठकीतच सुटणार आहे. मुख्य मंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार हे बुधवारी दुपारी नवी दिल्लीला जाणार असून केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशी चर्चेनंतरच खातेवाटपाचा तिढा सुटण्याची शक्यता आहे.भाजपने शिवसेनेच्या काही मंत्र्यांच्या समावेशाला आक्षेप घेतला असून शिंदे यांना गृह व महसूल खाते देण्यास नकार दिला आहे. मात्र शिंदे अजूनही गृह, महसूल व गेल्या मंत्रिमंडळातील खात्यांसाठी आग्रही असल्याने खातेवाटपाचा पेच सुटलेला नाही. शहा यांच्याबरोबर होणाऱ्या चर्चेत मार्ग निघाला, तर शुक्रवार किंवा शनिवारी मंत्रिमंडळ विस्तार होण्याची शक्यता आहे. अन्यथा तो नागपूर येथील हिवाळी अधिवेशनानंतरच करावा लागेल. खातेवाटप करून मंत्रिमंडळ विस्तार शनिवारपर्यंत मार्गी लावण्याचे फडणवीस यांचे प्रयत्न आहेत. मुख्यमंत्री व दोन उपमुख्यमंत्री यांचा शपथविधी गेल्या गुरूवारी होऊनही आठवडाभरात खातेवाटप न झाल्याने आणि मंत्रिमंडळ विस्तारही मार्गी लागत नसल्याने महायुतीतील तीनही पक्षांमध्ये अस्वस्थता आहे. शिंदे यांनी गृहसह गेल्या मंत्रिमंडळातील खात्यांचा आग्रह कायम ठेवल्याने खातेवाटपाची चर्चा पुढे सरकली नव्हती. त्यामुळे भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शिंदे यांची मंगळवारी ठाणे निवासस्थानी भेट घेवून चर्चा केली. फडणवीस यांनीही शिंदे यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा केली. पण मार्ग न निघाल्याने दिल्लीला जाऊन भाजप पक्षश्रेष्ठींशी चर्चा करण्याचे तीनही नेत्यांनी ठरविले. फडणवीस, शिंदे व पवार हे दिल्लीला जाऊन शहा, राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांची सदिच्छा भेट घेणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

# शिवसेनेत फिरती मंत्रीपदे

## इच्छुक आणि नाराजांच्या समाधानासाठी शिंदेची शक्कल



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

मुंबई : विधानसभा निवडणुकीतील यशानंतर शिवसेनेतील बहुसंख्य आमदारांना मंत्रिपदाचे वेध लागले असले, तरी पक्षाच्या वाट्याला आठ ते दहापेक्षा अधिक मंत्रीपदे येण्याची शक्यता नाही. त्यामुळे इच्छुक आमदारांचा नाराजी दूर करण्यासाठी आणि त्यांना थोपवून धरण्यासाठी अडीच-अडीच वर्षांची फिरती मंत्रीपदे देण्याचा तोडगा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काढल्याचे पक्षामधील उच्चपदस्थ सूत्रांनी सांगितले. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीतील भाजपला तब्बल १३२ जागा मिळाल्यामुळे शिवसेनेची सगळी समीकरणे बदलली आहेत. शिंदे यांचे पुन्हा मुख्यमंत्री होण्याचे स्वप्न धुळीला मिळालेच, शिवाय फडणवीस सरकारमध्ये किती मंत्रीपदे वाट्याला येणार हेदेखील अद्याप निश्चित झालेले नाही. शिंदे गटातील सर्वच माजी मंत्री पुन्हा आस लावून बसले आहेत. गेल्या वेळी संधी हुकलेले ज्येष्ठ नेतेही आशेवर आहेत. आमदारांच्या महत्त्वाकांक्षांमुळे शिंदे यांची डोकेदुखी वाढली असून त्यांचे समाधान करताना नाकीनऊ येत आहेत. मागच्या सरकारमधील मंत्र्यांना दूर ठेवून नव्या चेहऱ्यांना संधी द्यावी, अशी मागणी गोगावले यांनी उघडपणे केली असताना अन्य आमदारही दबक्या आवाजात चर्चा करीत आहेत. प्रताप सरनाईक, संजय शिरसाट यांनाही मंत्री व्हायचे आहे. नव्या विधानसभेच्या पाहिल्या अधिवेशनात सत्ताधारी शिवसेनेच्या आमदारांमध्ये मंत्रीपदाचीच अधिक चर्चा होती. शिंदे यांची भेट घेऊन अनेकांनी इच्छाही व्यक्त केल्याचे समजते.

# अकरा जिल्ह्यात बोगस कंपन्यांकडून औषध पुरवठा?

## ठाणे जिल्ह्याचाही सामावेश

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

बनावट कंपन्यांद्वारे महाराष्ट्रातल्या तब्बल ११ जिल्ह्यात गोळ्या औषधांचं पुरवठा झाल्याची धक्कादायक गोष्ट समोर आली आहे. गंभीर म्हणजे जानेवारीपासून सरकारी संस्थांमधून या गोळ्या-औषधांचा पुरवठा झालाय. सुदैवानं औषध विभागाने साठा प्रतिबंधित केल्याने त्याचं वितरण झालं नाही. पण इतर जिल्ह्यांमध्ये बनावट औषधांचं वाटप झाल्याचं समोर येतंय. बीडमधल्या अंबाजोगाईत सरकारी स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयातही हा साठा होता. याप्रकरणी सूरत आणि ठाणे या दोन ठिकाणी ४ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आलाय. स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय हे सर्वसामान्य लोकांसाठी मोठा आधार मानलं जातं. पण इथं एका अटिबायोटिक गोळीत एजीथ्रोमायसिन हा घटकच नसल्याचं




समोर आलं. माहितीनुसार, ज्या बनावट कंपन्यांच्या नावानं महाराष्ट्रात औषध पुरवठा झाला त्यात मिस्टल फॉम्युलेशन उत्तराखंड, रिफंट फार्मा केरळ, कॉम्युलेशन - आंध्र प्रदेश. मेलवॉन बायोसायन्सेस केरळ आणि एसएमएन लॅब उत्तराखंड या कंपन्यांचा समावेश होता. तक्रारीनंतर महाराष्ट्राच्या औषध विभागाने संबंधित राज्यांच्या वैद्यकीय यंत्रणांशी संपर्क केला. त्यात मिळालेल्या उत्तरात संबंधित पत्त्यावर अशा कोणत्याही कंपन्याच नसल्याचं समोर आलं. त्यामुळे या कंपन्यांच्या नावानं महाराष्ट्रात नेमकं कोण औषध देतं होतं? यामागचे मास्टरमाईंड कोण आहेत? हा प्रश्न अनुत्तरित आहे. माहितीनुसार, धाराशीवला मिस्टल कंपनीचा औषधसाठा मिळाला होता तो परभणी, रायगड, रत्नागिरी, वाशिम, छत्रपती संभाजीनगर, बीड, नांदेड, सिंधुदुर्ग, अमरावती, ठाणे आणि हिंगोली या जिल्ह्यांकडून पाठवला गेल्याची माहिती आहे. यातली रंजक गोष्ट म्हणजे जेव्हा बीडमधल्या प्रकरणानंतर चौकशीला सुरुवात झाली, तेव्हा बोगस औषधांचं हे रॅकेट अजून खोलवर पोहोचलं.

त्यामुळे या ५ कंपन्यांच्या नावे महाराष्ट्रात बोगस औषधांचा पुरवठा नेमकं कोण करत होतं? इतक्या महिन्यांपासून सामान्य लोकांच्या आरोग्याशी सुरु असलेला हा खेळ राजरोसपणे कसा काय सुरु होता? या प्रश्नांची उकल होणं गरजेचं आहे.

# सरकारी प्रकल्पांमुळे 'धुळधाण'

## एमएमआरडीए आणि एमएसआरडीसी कडून नियमांची पायमल्ली

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**- प्रतिनिधी**

**ठाणे :** राज्यात वायूप्रदूषणामुळे एकीकडे खासगी विकासकांच्या बांधकामांना प्रदूषण रोखण्यासाठी नियमावली आखून दिली जात असताना दुसरीकडे सरकारी प्रकल्पांच्या कामांमुळे शहरात धुळधाण निर्माण होत असल्याचे चित्र आहे. ठाणे शहरातील मेट्रो, घोडबंदर सेवा आणि मुख्य रस्ते जोडणी आणि मुंबई नाशिक महामार्गाच्या रुंदीकरणाची कामे सुरू आहेत. या कामांमुळे मोठ्याप्रमाणात धुळीचे साम्राज्य निर्माण होते.

या धुळीवर नियंत्रण राहावे यासाठी पुरेशी उपाययोजना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) आणि राज्य रस्ते विकास महामंडळाकडून (एमएसआरडीसी) केली जात नसून यामुळे नियमांची अंमलबजावणी सरकारी यंत्रणांकडूनच पाळली जात नसल्याचे चित्र आहे.

ठाणे जिल्ह्यात मागील काही वर्षांपासून विविध प्रकल्पांची कामे सुरू आहेत. यातील सर्वांत महत्त्वाचे वडाळा-घाटकोपर-कासारवडवली या मेट्रो मार्गिकेचे काम सुरू आहे. तसेच घोडबंदर भागात लोकवस्ती वाढली असून वाहतूक कोंडीची समस्या नागरिकांना सहन करावी लागते. त्यामुळे मुख्य रस्ता आणि सेवा रस्त्याचे एकत्रिकरण करण्याचा प्रकल्प देखील हाती घेण्यात आला आहे. या दोन्ही प्रकल्पांचे काम 'एमएमआरडीए'कडून सुरू आहे. तर, मुंबई नाशिक महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम 'एमएसआरडीसी'कडून केले जात आहे. परंतु या कामाचा परिणाम नागरिकांना सहन करावा लागत आहे. हिवाळ्यामध्ये प्रदूषणाचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे धुळीकण हवेच्या खालील स्तरावर तरंगतात. वायू प्रदूषणास महत्त्वाचे कारण हे धुळीकण ठरत असतात. मुंबई नाशिक महामार्ग आणि घोडबंदर भागात विविध प्रकल्पांच्या कामामुळे ठिकठिकाणी धुळीकण निर्माण होऊन ते नागरिकांच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरू लागले आहे. धुळीकण डोळ्यात आणि फुफ्फुसात जात आहे.



> मुंबई नाशिक महामार्गाच्या रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण आणि डांबरीकरण झाले आहे. त्यामुळे धुळीचे प्रमाण कमी झाले आहे. तसेच कामाच्या ठिकाणी नियमांचे उल्लंघन होत असेल तर तेथील कंत्राटदारांना सूचना देण्यात येईल.
>
> **❍ रमेश खिस्ते,**
> **अधीक्षक अभियंता,**
> **राज्य रस्ते विकास महामंडळ.**

> रस्त्याकडेला मातीचे ढिगारे असल्यास त्या ढिगाऱ्यांतून धुळीकण निर्माण होतात. हे धुळीकण डोळ्यात आणि फुफ्फुसामध्ये शिरतात. फुफ्फुसामध्ये धुळीकण गेल्यास ते बाहेर निघण्याचा मार्ग नसतो. त्यामुळे हे धुळीकण नागरिकांच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरते.
>
> **❍ मोहसिन खान-पठाण,**
> **वातावरण संस्था.**

# ठाणे जिल्ह्यात कुपोषितांची संख्या घटली

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** दि. ११ - कुपोषणाचा टक्का कमी करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या वतीने समुपदेशन, प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष आहार अशी त्रिसूत्री कार्यक्रम राबवण्यात येत आहे. यासाठी महिला व बालविकास विभागामार्फत विशेष प्रयत्न सुरू असून ग्रामीण भागातील कुपोषित बालकांची संख्या सप्टेंबर २०२४ रोजी अखेर तीव्र कुपोषित (सॅम) ८८ तर मध्यम कुपोषित (मॅम) १ हजार ०२३ होती तर नोव्हेंबर २०२४ रोजी अखेर (तीव्र कुपोषित) सॅम २२ तर मध्यम कुपोषित (मॅम) ६२ कुपोषित बालकांची संख्या कमी करण्यात यश आले आहे.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाने समुपदेशन, प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष आहार अशी त्रिसूत्री कार्यक्रम १ हजार ६४७ अंगणवाडीतील ८३ हजार ४२७ बालकांसाठी राबवण्यात येत आहे. तसेच दत्तक पालक योजना, पालकसभा घेऊन मुलांचा दिनक्रम, आहाराच्या वेळा, चविष्ठ आणि तितकेच सकस अन्न बालकांना देण्यासाठी प्रशिक्षण देण्यात येत आहे.

------------------

**जिल्ह्यातील मागील तीन महिन्यातील कुपोषित बालकांची संख्या**

सप्टेंबर २०२४ रोजी अखेर तीव्र कुपोषित (सॅम) ८८ तर मध्यम कुपोषित (मॅम) १ हजार ०२३,
ऑक्टोबर २०२४ रोजी अखेर तीव्र कुपोषित (सॅम) ७६ तर मध्यम कुपोषित (मॅम) १ हजार ००९,
नोव्हेंबर २०२४ रोजी अखेर तीव्र कुपोषित (सॅम) ६६ तर मध्यम कुपोषित (मॅम) ९६१ आहेत.

------------------

कुपोषित बालकांची संख्या कमी करण्याच्या उद्देशाने आयआयटी मुंबई सारख्या नामांकित संस्थाचा देखील सहभाग घेण्यात आला असून बालकांची काळजी घेण्यासाठी व्हिडीओ मार्फत तसेच पालकांना प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात येत असल्याची माहिती जिल्हा कार्यक्रम अधिकारी संजय बागुल यांनी दिली आहे. गरोदरपणात मातेला योग्य सकस आहार न मिळाल्यास मूल कुपोषित जन्माला येण्याची शक्यता असते. तर मूल जन्मल्यानंतर त्याला मातेचे पुरेसे दूध व पोषण आहार न मिळाल्यास बालके कुपोषणाच्या विळख्यात अडकू शकतात. त्यामुळे गरोदरपणात व प्रसूतीनंतर मातांना व सहा महिन्यांनंतर बालकांना नियमितपणे अंगणवाडी सेविकांमार्फत पोषण किट वाटप करण्यात येत आहे.

जिल्हा प्रशासनाकडून गरोदर व स्तनदा मातांना बाळंतवीडा, कुपोषित मुलांना पोषकवडी, स्तनदा मातांना पाळणा इ. नाविण्यपूर्ण उपक्रम राबविले जात आहेत. त्याचबरोबर विविध स्वंयसेवी संस्था (उदा.स्नेहा फाऊंडेशन, अन्नदा फाऊंडेशन इ.) च्या मदतीने डोळखांब/शहापूर प्रकल्पातील कुपोषित बालकासाठी कामकाज करण्यात येत आहे. परिणामी प्रतीवर्ष कुपोषीत बालकांमध्ये सुधारणा टक्केवारीत वाढ होत आहे.

## एकतीस हजार हरकती

# वसई विरार महापालिकेत एकोणतीस गावांचा समावेश वादातीत

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

वसई- गावे महापालिकेत ठेवण्याच्या शासन निर्णयावर मागवलेल्या हरकती आणि सुचनांवर सुनावणी प्रक्रिया होणार असल्याने पुन्हा एकदा २९ गावांचा मुद्दा चर्चेत आला आहे. मात्र गाव आंदोलकांनी या हरकतींची प्रक्रियाच बेकायेदशीर असल्याचा आरोप केला आहे.

२०११ साली राज्य शासनाने वसई विरार महापालिकेतून २९ गावे वगळली होती. परंतु त्या निर्णयाला न्यायालयात आव्हान दिल्यानंतर १३ वर्ष प्रकरण न्यायालयात प्रलंबित होते. १४ फेब्रुवारी २०२४ रोजी राज्य शासनाने गावे वगळण्याचा २०११ चा निर्णय रद्द केला आणि गावे पुन्हा महापालिकेत समाविष्ट करत असल्याचा नवीन अध्यादेश जाहीर केला होता. या अध्यादेशावर हरकती आणि सूचना मागविण्यात आल्या होत्या. त्यासाठी ३० दिवसांची मुदत देण्यात आली होती. त्या कालावधीत ३१ हजार ३८९ हरकती आणि सूचना आल्या होत्या. त्यात गावे महापालिकेतून वगळू नयेत यासाठी ११ हजार ५९१ तर वगळण्यात यावीत यासाठी १९ हजार ७९८ अर्ज प्राप्त झाले होते. या हरकती आणि सूचनांवर आता पालघर जिल्हाधिकारी कार्यालयात १६ डिसेंबरपासून सुनावणी घेतली जाणार आहे. मात्र गावे वगळण्यासाठी लढणाऱ्या आंदोलकांनी त्यावर आक्षेप घेतला आहे.



> राज्य शासनाने वसई विरार महापालिकेत २९ गावे कायम ठेवण्याच्या निर्णयावर तब्बल ३१ हजार हरकती आणि सूचना आल्या आहेत. त्यात गावे वगळावी यासाठी १९ हजार तर गावे वगळू नये यासाठी ११ हजार हरकती आल्या आहेत. या सर्व हरकती आणि सूचनांवर १६ डिसेंबरपासून जिल्हाधिकारी कार्यालयात सुनावणी होत आहे.

गावे महापालिकेत ठेवण्याचा अध्यादेश १४ फेब्रुवारी रोजी काढला आणि त्यावर हरकती मागविल्या. परंतु १२ मार्च रोजी लोकसभेची आचारसंहिता लागू झाली. त्यानंतर कोकण पदवीधर विधानपरिषद निवडणूक आचार संहिता लागली आणि मग विधानसभा निवडणूक आचार साहिंता लागू झाली. या कालावधीत हरकतींची प्रकिया झाली कधी आणि कशी? असा सवाल आंदोलकांचे याचिकाकर्ते ॲड जिमी घोन्साल्विस यांनी केला आहे. १२ मार्च रोजी लोकसभेसाठी आचारसंहिता लागू झाली होती. त्यामुळे हरकती नोंदविण्याचा ३० दिवसांची मुदतही पूर्ण झाली नसल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. २०२० साली देखील गावे वगळण्याच्या मुद्यांवर हरकती मागविण्यात आल्या होत्या. त्यावेळी २९ हजार जणांनी गावे वगळण्याचा कौल दिला होता. आता ज्या ११ हजार जणांनी गावे महापालिकेत ठेवाली असे सांगितले आहेत ते बोगस असल्याचा दावा आंदोलकांचे नेते विजय पाटील यांनी केला आहे.

### अवमान याचिका दाखल

शासनाने २०११ चा अध्यादेश रद्द केला आणि न्यायालयाने गावे वगळण्यासंदर्भातील याचिका बरखास्त केल्या. यामुळे गावे महापालिकेतून वगळली आहेत असा दावा ॲड जिमी घोन्साल्सिव यांनी केला आहे. ही गावे वगळण्याची प्रक्रिया न राबविल्याने आम्ही पालिका आयुक्त अनिलकुमार पवार आणि नगर सचिव राव यांच्या विरुद्ध अवपमान याचिका उच्च न्यायालयात दाखल केली आहे. आता नव्याने हरकतींवर सुनावणी हा प्रशासनाचा सावळा गोंधळ असून प्रशासनाकडून भारतीय संविधानातील २४३ क्यू या अनुच्छेदाची पायामल्ली होत आहे. या सगळ्या बाबी आम्ही न्यायाल्याच्या सुनावणी दरम्यान निदर्शनास आणून देऊ असेही त्यांनी सांगितले.

# कोळसेवाडी पोलिसांनी केला विशेष पोलीस अधिकारी सन्मान



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**

कोळशेवाडी पोलीस स्टेशन येथे विधानसभा निवडणूक २०२४ बंदोबस्ताकरीता कोळशेवाडी पोलीस स्टेशन हद्दीतील कॉलेजकडून ज्या विशेष पोलीस अधिकारी यांची मदत घेण्यात आली होती. त्यांना कोळसेवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कदम यांच्यासह पोलीस निरीक्षक गुन्हे, पोलीस निरीक्षक प्रशासन यांच्याहस्ते प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. या कार्यक्रमास पोलीस अंमलदार, पोलीस मित्र उपस्थित होते. यावेळी कमला देवी कॉलेज, साकेत कॉलेज, मॉडेल कॉलेज, सम्यक कॉलेज, कल्याण पूर्व येथील १६ विशेष पोलीस अधिकारी, एनसीसी विद्यार्थी यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले असल्याची माहिती व. पो. नि. अशोक कदम यांनी दिली.

# होमी भाभा राज्य विद्यापीठात राष्ट्रीय परिषद संपन्न

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**




होमी भाभा राज्य विद्यापीठात नुकतेच तीन दिवसीय राष्ट्रीय परिषद संपन्न झाली. परिषदेत डेटा सायन्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग आणि डीप लर्निंगच्या साहाय्याने पर्यावरण व आरोग्य समस्यांवरील उपायांवर चर्चा झाली. परिषदेत १५० संशोधक, उद्योगतज्ज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञ सहभागी झाले. प्री-कॉन्फरन्स ट्युटोरियल्स, सिग्नल प्रोसेसिंगवरील व्याख्याने, आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवरील कार्यशाळा यांसारखे सत्र आकर्षण ठरले. परिषदेत ७ सामंजस्य करार झाले असून, उद्योग-शिक्षणसंस्थांतील संवादासाठी नवे व्यासपीठ उभे राहिले असल्याची माहिती होमी भाभा राज्य विद्यापिठाचे कुलगुरु डॉ. रजनीश कामत यांनी दिली.

# दुर्गाडी किल्ल्याचा निकाल म्हणजे सत्याचा विजय - माजी आमदार नरेंद्र पवार

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**

## न्यायालयाच्या निकालानंतर दुर्गादेवीचे दर्शन घेत केली आरती



दुर्गाडी किल्ल्याच्या मालकी हक्काबाबत कल्याणच्या दिवाणी न्यायालयाने दिलेला निकाल म्हणजे सत्याचा विजय असल्याची प्रतिक्रिया भाजपचे माजी आमदार नरेंद्र पवार यांनी दिली आहे. कल्याण न्यायालयाच्या या महत्त्वपूर्ण निकाला नंतर माजी आमदार नरेंद्र पवार यांच्यासह राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांनी दुर्गाडी किल्ल्यावर देवीचे दर्शन घेत आरतीही केली.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या कल्याणच्या ऐतिहासिक नगरीचे सांस्कृतिक वैभव म्हणून दुर्गाडी किल्ला आणि इथल्या दुर्गादेवीची ओळख आहे. त्यासंदर्भातील शासकीय दस्तावेज आणि अनेक इतिहासकारांच्या नोंदी असतानाही साडेचार दशकांपूर्वी किल्ल्याच्या मालकी हक्काबाबत न्यायालयात दावा करण्यात आला होता. मात्र न्यायालयाने हा दावा फेटाळून लावत दुर्गाडी किल्ल्याची जागा ही राज्य शासनाच्या मालकीची असल्याचा ऐतिहासिक आणि महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. या निर्णयामुळे गेली चार दशके इथल्या हिंदूंच्या वाहीवाटीसाठी अनेकांनी दिलेला लढा, समर्पण आणि त्याग खऱ्या अर्थाने सार्थकी लागला असल्याची भावनाही माजी आमदार नरेंद्र पवार यांनी यावेळी व्यक्त केली.

यावेळी माजी आमदार नरेंद्र पवार यांच्यासह राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कल्याण जिल्हा सहकार्यवाह बुद्धीप्रकाश मित्तल, प्रतापनगर कार्यवाह प्रविण शिंपी, ज्येष्ठ शिवसैनिक रवी कपोते, राणी कपोते तसेच सकल हिंदू समाज बांधव उपस्थित होते.

# हृदयाच्या दुर्लभ आजाराने त्रस्त ३४ वर्षीय महिलेवर यशस्वी उपचार

## मुंबईतील ही पहिली शस्त्रक्रिया लीलावती रूग्णालयात पडली पार




**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**

मल्टिपल एन्युरिझम ऑफ सायनस ऑफ वलसाल्वा या गंभीर हृदयविकाराने त्रस्त महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यात राहणारी ३४ वर्षीय महिलेवर मुंबईतील लीलावती रुग्णालयात यशस्वी उपचार करण्यात आले आहेत. लीलावती हॉस्पिटल चे हृदयरोग शल्यचिकित्सक डॉ.पवन कुमार यांच्या नेतृत्वाखाली हृदयरोगतज्ज्ञ डॉ.नितीन गोखले आणि हृदयविकारतज्ज्ञ डॉ. नम्रता कोठारी यांनी ही शस्त्रक्रिया केली आहे. मुंबईत एकापेक्षा अधिक एन्युरिझम्स ची पहिल्यांदाच ही शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.

सीमा पाटील (३४) या महिलेला श्वास घेण्यास त्रास होत होता. त्यांची प्रकृती खालावलेली पाहून कुटुंबीयांनी त्यांना स्थानिक रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय तपासणीत हृदय नीट काम करत नसल्याचे समोर आले.

इकोकार्डियोग्राम आणि सीटी स्कॅनसह इतर वैद्यकीय चाचण्या करण्यात आल्या. यामध्ये महिलेला मल्टीपल एन्युरिझम ऑफ सायनस ऑफ वलसाल्वा या गंभीर आजाराचे निदान झाले. पुढील उपचारासाठी डॉक्टरांनी महिलेला लीलावती रूग्णालयात दाखल करण्याचा सल्ला दिला.लीलावती रूग्णालया तील कार्डिओव्हस्कुल सर्जन डॉ. पवन कुमार म्हणाले की, 'लीलावती रूग्णालायतील वैद्यकीय तपासणीत दोन एन्युरिझमचे निदान झाले. एक वलसाल्वा च्या डाव्या कोरोनरी सायनसमध्ये (४.५x ३.५ x ३ सेमी मोजमाप) आणि दुसऱ्या वलसाल्वा च्या उजव्या कोरोनरी सायनमधअये आखणी एक एन्युरिझम (३.५ x २.५ x २.५ सेमी मोजमाप) होते. सायनस ऑफ वलसाल्वा (एएसओव्ही) हा एक अत्यंत दुर्मिळ हृदयरोग आहे. ज्याचे प्रमाण सामान्य लोकांमध्ये ०.०९% आणि जन्मजात हृदय दोषांचे ०.१% - ३.५% आहे. मल्टिपल एन्युरिझम ऑफ सायनस ऑफ वलसाल्वा प्रामुख्याने ७० प्रकरणांमध्ये उजव्या कोरोनरी सायनसमधअये तर २५% प्रकरणांमध्ये नॉन-कोरोनरी सायनसपासून आणि क्वचितच डाव्या कोरोनरी सायनसमध्ये आढळतात. जगभरात अशा प्रकारची केवळ १८ प्रकरणे नोंदवली गेली आहेत तर सहा प्रकरणे भारतात नोंदवली गेली आहेत तर अशा चार प्रकरणांवर शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. परंतु, मुंबईतील हे पहिलेचं प्रकरण आहे.डॉ. कुमार पुढे म्हणाले की, ही गुंतागुंतीची शस्त्रक्रिया सात तास चालली. या शस्त्रक्रियेमध्ये डाव्या कोरोनरी सायनस एन्युरिझमची दुरुस्ती करणे हे डाव्या कोरोनरी धमनीच्या जवळ असल्यामुळे एक अत्यंत आव्हानात्मक होते. उजवीकडील कोरोनरी सायनस एन्युरिझम बंद करत महाधमनी झडप बदलण्यात आली. या पध्दतीमुळे महाधमनी झडप सुरक्षितपणे बदलण्यात आली आणि डाव्या सायनस ऑफ वलसाल्वा (एएसओव्ही) ची दुरुस्ती करण्यात आली. या शस्त्रक्रियेनंतर रूग्णाच्या प्रकृतीत सुधारणा पाहून त्याला घरी सोडण्यात आले.

रूग्ण सीमा पाटील म्हणाल्या की, 'हृदयाचा गंभीर आजार झाल्याचे निदान झाल्यानंतर मी खूप घाबरली होती. मी जगण्याची आशा सोडून दिली होती. मात्र लीलावती रुग्णालयाच्या डॉक्टरांनी माझ्यावर उपचार करून मला नवजीवन दिले. आता मी पूर्वीपेक्षा खूप बरी आहे. मला नवीन आयुष्य दिल्याबद्दल मी डॉक्टरांच्या टीमची खूप आभारी आहे.'

# बिर्ला महाविद्यालयात वॉइस ऑफ द वेटलॅंडस झोनल पथनाट्य स्पर्धा संपन्न

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**



पर्यारण दक्षता मंडळ, एन्व्हायरो विजिल, मुंबई विद्यापीठ- राष्ट्रीय सेवा समिती, असोसिएशन ऑफ टीचर्स इन बायोलॉजिकल सायएनसेस, रोटरी क्लब ऑफ कल्याण सिटी आणि बि. के. बिर्ला महाविद्यालय, कल्याण यांच्या संयुक्त विद्यमाने 'वॉइस ऑफ द वेट लॅंडस' या झोनल पथनाट्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. ही स्पर्धा पर्यावरण दक्षता मंडळाच्या स्वच्छ खाडी अभियान ह्या उपक्रमा अंतर्गत मंगळवारी बिर्ला महाविद्यालयात आयोजित करण्यात आली होती.

विविध १४ महा विद्यालयांमधील राष्ट्रीय सेवा समिती संघांनी उत्साहाने सहभाग घेतला आणि पाणथळभूमींचे संवर्धन, पाणथळभूमी आणि निसर्ग सहल, तसेच पाणथळभूमींचे महत्त्व या विषयांवर प्रभावी व सर्जनशील पथनाट्ये सादर केली. या सादरीकरणांद्वारे विद्यार्थ्यांनी पाणथळभूमींच्या संरक्षणाचे महत्त्व आणि त्या पर्यावरणासाठी कशा महत्त्वाच्या आहेत हे मांडले. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून पर्यावरणतज्ज्ञ -डॉ. मानसी काळे आणि पथनाट्य क्षेत्रातील तज्ज्ञ गौरव निमकर उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पथनाट्यांमधून तीन उत्कृष्ट संघांची निवड करण्यात आली, ज्यांनी त्यांच्या सर्जनशीलता, सादरीकरणाची गुणवत्ता आणि विषयाशी सुसंगतता दाखवली.


समारोप समारंभाला अनेक मान्यवर उपस्थित होते, त्यामध्ये रोटरी क्लबचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रोटेरियन दिनेश मेहता, एनएसएस जिल्हा समन्वयक जीवन विचारे, क्षेत्र समन्वयक डॉ. संजय जयभये आणि नीरज मिश्रा, रोटरी क्लब ऑफ कल्याण सिटीचे अध्यक्ष रो. हायसिंथ बेटासिवाला,पर्यावरण दक्षता मंडळाचे संस्थापक प्रा. विद्याधर वालावलकर, आणि स्वच्छ खाडी अभियान २५ अंतर्गत राष्ट्रीय परिषदेचे समन्वयक डॉ. पुरुषोत्तम काळे यांचा समावेश होता. मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि पर्यावरण संरक्षणासाठी तरुण पिढीच्या योगदानाचे महत्त्व विशद केले.कॉलेजचे प्राचार्य अविनाश पाटील आणि चेअरमन नरेशचंद्रन यांनी कार्यक्रमासाठी मोठा पाठिंबा दिला. रोटरी क्लब आणि पर्यावरण दक्षता मंडळाच्या सदस्यांनी व्यवस्थापन आणि नियोजनाची जबाबदारी उत्तम प्रकारे सांभाळली. पर्यावरण दक्षता मंडळाच्या रुपाली शाईवाले यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन बि. के. बिर्ला कॉलेजच्या एनएसएस स्वयंसेवकांनी सुरळीत पार पाडले.

या स्पर्धेत एकूण १५० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आणि पाणथळभूमींच्या संरक्षणाविषयी जनजागृती केली. विद्यार्थ्यांनी सर्जनशील पद्धतीने पर्यावरणाविषयी महत्त्वाचे संदेश दिले, ज्यामुळे कार्यक्रम अत्यंत प्रभावी आणि यशस्वी ठरला. या पथनाट्य स्पर्धेत बि. के. बिर्ला कॉलेज कल्याण यांनी तिसरे बक्षीस व एस एस टी कॉलेज, उल्हासनगर यांनी दूसरे बक्षीस मिळाले, तर अचिव्हर्स कॉलेज, कल्याण हे सर्वोत्कृष्ट पथनाट्य चे मानकरी ठरले.

# केडीएमसीच्या ई प्रभागातील रस्ता रुंदीकरणात बाधित इमारतीच्या बांधकामावर निष्कासनाची कारवाई

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**

कल्याण डोंबिवली महा पालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड व अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे यांच्या निर्देशानुसार, अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे उपायुक्त अवधुत तावडे यांच्या मार्गदर्शनाखाली ई प्रभागाचे सहा.आयुक्त चंद्रकांत जगताप यांनी डोंबिवली (पूर्व) येथील स्टार कॉलनी ते समर्थ चौक या २४ मी. रस्ता रुंदीकरणात बाधित होत असलेल्या ओम रेसिडेन्सी या तळ + ४ मजली इमारतीच्या बांधकामावर निष्कासनाची कारवाई काल सुरु केली.



या इमारतीमध्ये १६ सदनिका धारक व ६ गाळेधारकांना नोटीसा देवून इमारत रिकामी करण्यात आली होती. ही कारवाई अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागातील कामगार, महापालिका पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या मदतीने आणि हाय जॉ क्रश मशीन, १ पोकलेन व १० मजूर यांच्या सहाय्याने करण्यात येत आहे. हि कारवाई आजही सुरु राहणार असल्याची माहिती ई प्रभागाचे सहा. आयुक्त चंद्रकांत जगताप यांनी दिली आहे.

# परभणी घटनेच्या निषेधार्थ रिपब्लिकन सेनेचे मुख्यमंत्र्यांना पत्र

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**



डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू, रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांच्या आदेशान्वये व काकासाहेब खांबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली परभणीतील झालेल्या विटंबनेच्या निषेधार्थ डोंबिवली पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस आयुक्त सुहास नेमाडे यांच्यामार्फत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले. विटंबना करणाऱ्या विरोधात देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून असे कृत्य त्याच्याकडून करवून घेणाऱ्याला पाठीशी घालणाऱ्याचां शोध पोलीस प्रशासनाकडून लवकरात लवकर घ्यावा. या व इतर प्रमुख मागण्या या निवेदनात देण्यात आल्या. या मागण्या पूर्ण न झाल्यास येत्या काही दिवसात रिपब्लिकन सेनेतर्फे तीव्र आंदोलन छेडण्याचा जाहीर इशारा या निवेदनात देण्यात आला.

या निवेदनावर रिपब्लिकन सेनेचे कल्याण डोंबिवली जिल्हाध्यक्ष तथा ठाणे जिल्हा निमंत्रक आनंद नवसागरे, डोंबिवली महिला अध्यक्षा सुरेखा जाधव, उपाध्यक्षा जया कदम, सुभाष शिरसाट, डोंबिवली शहर संघटक युवराज वाटूरे, देवा खिल्लारे, सुरेश सावंत, विकास आघाम आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# पथदिवे आणि पदपथांवर शौचालय उभारण्याची आई एकविरा महिला मंडळाची मागणी



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(कुणाल म्हात्रे) :**

कल्याण पूर्वेतील आडीवली परिसरात विविध ठिकाणी पथदिवे बसविण्याची आणि कल्याण पूर्वेतील चक्कीनाका ते नेवाळी या दरम्यान पदपथावर महिलांच्या सोयीसाठी शौचालय बांधण्याची मागणी आई एकविरा महिला मंडळाने केली असून याबाबत मंडळाच्या संस्थापक अध्यक्षा सोनी क्षीरसागर आणि समाजसेवक संदीप क्षीरसागर यांनी केडीएमसी आयुक्त इंदुराणी जाखड आणि शहर अभियंता अनीता परदेशी यांची भेट घेत निवेदन दिले आहे.आडीवली परिसरात विविध ठिकाणी मंडळाच्या वतीने पथदिवे लावण्याकरता वारंवार केडीएमसीच्या विद्युत विभागाकडे पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे. तरी देखील अजून पथदिवे उभारण्यात आलेले नाही. आडीवली येथील गणेश चौक ते जयराम सदन, राजाराम पाटील नगर, सद्‌गुरू अपार्टमेंट, प्रदीप नगर ते अनंता भोईर चौक, अनंता भोईर चौक, ऑस्टीन नगर, महावीर फर्निचर, शनिवार पार्क मार्ग, चेतन पार्क मार्ग, नवरत्न रेसिडेन्स, दुर्गा देवी मंदिरापर्यंत, म्हसोबा मंदिर, आडिवली तलावाच्या चारी बाजुने या परिसरांची यादी देण्यात आली आहे.या विभागात खूप मोठ्या प्रमाणात अंधार असून रात्री अपरात्री महिला व नागरिकांना त्यांचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे याची त्वरित दखल घेऊन पथदिवे उभारण्याची मागणी आई एकविरा महिला मंडळाने केली आहे.






तसेच कल्याण पूर्वेतील चक्कीनाका ते श्री मलंग रोड, नेवाळी नाक्यापर्यंत खूप मोठया प्रमाणात नागरीक वस्ती निर्माण झाली असून महिलांना प्रवासादरम्यान शौचालयासाठी गैरसोय होत आहे. त्यामुळे महिलांना खूप मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे महिलांसाठी कोणत्याही प्रकारचे शौचालय उपलब्ध नाही. महिलांचा हा त्रास कमी करण्याकरिता चक्कीनाका ते नेवाळी नाका दरम्यान पदपथावर शौचालय बांधण्यात यावे असे देखील निवेदन मंडळाच्या वतीने करण्यात आली आहे.

## केडीएमसी आयुक्त आणि शहर अभियंत्यांना दिले पत्र

दरम्यान येत्या एक महिन्यात पथदिव्यांच्या कामाची सुरुवात होणार असल्याचे आश्वासन शहरा अभियंता अनिता परदेशी यांनी दिले असून महिलांसाठीच्या शौचालयासाठी लवकरात लवकर पाहणी करण्यात येईल असे आश्वासन आयुक्तांनी दिले असल्याचे क्षीरसागर यांनी सांगितले.

# नादप ग्रामपंचायत उपसरपंच पदी जयेश शेलार



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता टिटवाळा(प्रतिनिधी) :**

कल्याण तालुक्यातील नादप ग्रामपंचायत उपसरपंच पदी जयेश शेलार या तरुण कार्यकर्त्याची निवड झाली आहे. पदवी शिक्षण पूर्ण केलेले जयेश यांनी उपसरपंच पदी निवड होताच नादप ग्रामपंचायती हद्दीतील नागरिकांना पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी वचनबद्ध असल्याचे सांगितले. त्यांच्या निवडीचे सर्व थरत्तून अभिनंदन होत आहे.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मध्ये कंपनी, मिळकत, जमीन- जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट, पोटगी, नावात बदल आदी कायदेविषयक छोट्या जाहिरातीना केवळ ५००/- रुपयांत प्रसिद्धी दिली जाईल; कोणत्याही शासकीय नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.

:: कार्यालय ::

९६१९१८८५५८ / ९१५८०७८६०१

- E Mail -

jeevandeepvartanews2020@gmail.com news.thanejeevandeep@gmail.com




१२ डिसेंबर २०२४

गुरुवार

**मेष**

कौटुंबिक आणि आर्थिक बाबतीत घेतलेले महत्त्वाचे निर्णय सकारात्मक होतील.तुम्ही तुमच्या मोठ्या भावाशी मालमत्तेशी निगडीत काही गोष्टी बोलाल.

**वृषभ**

दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. कोणत्याही नकारात्मक परिस्थितीत नर्व्हस होण्याऐवजी त्यावर उपाय शोधलात तर तुम्हाला उपाय सापडेल.

**मिथुन**

मेहनतीने योजनेला गती मिळेल. दिवस तुमच्यासाठी अनुकूल असणार आहे. काम करण्यापूर्वी त्यासंबंधीची योग्य माहिती मिळवून त्यावर काम करू.

**कर्क**

वित्ताशी संबंधित काही योजना बनवाल. तुमची कामाची आवड तुम्हाला कठोर परिश्रम करण्याची क्षमता देईल. प्रवास करण्यासाठी दिवस अनुकूल आहे.

**सिंह**

वाहन किंवा कोणत्याही महागड्या उपकरणाचे नुकसान झाल्यास मोठा खर्च होईल. आज तुमच्या दिनचर्येत काही बदल केल्यास नवीन संधी मिळतील.

**कन्या**

तुम्हाला चांगले परिणाम मिळतील. उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण होतील. वडीलधाऱ्यांचे प्रेम आणि आशीर्वाद या मुळे घरात शांततापूर्ण वातावरण राहील.

**तूळ**

कुटुंबातील सदस्यांमध्ये प्रेम आणि सौहार्दाची भावना असेल. दिवस सुवर्ण दिवस असणार आहे.खोलवर विचार करून तुमचे नाते सुधाराल.

**वृश्चिक**

दुपारनंतर तुम्हाला तुमच्या भविष्याशी संबंधित काही चांगली बातमी देखील मिळेल.आजचा दिवस तुमच्यासाठी नवीन उत्साहाने भरलेला असणार आहे.

**धनु**

दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे. अनेक वैयक्तिक कामांमध्ये दिवस जाईल. स्वतःवर विश्वास ठेवा. क्षमतेपेक्षा जास्त कामाचा ताण घेऊ नका.

**मकर**

जबाबदाऱ्या असतील, त्यापासून दूर पळण्याऐवजी तुम्ही त्या चांगल्या पद्धतीने पूर्ण करण्याचा प्रयत्न कराल. निर्णय घाईत घेऊ नका.

**कुंभ**

आर्थिक स्थिती मजबूत राहील, वस्तू खरेदी करण्यासाठी बाजारात जाऊ शकता. नवीन तंत्रज्ञान वापरण्याशी संबंधित कार्यपद्धतीवर चर्चा होईल.

**मीन**

तुम्ही मालमत्ता किंवा वाहन खरेदी करण्याचा विचार करत असाल त्याची अंमलबजावणी करण्यासाठी ही अनुकूल वेळ आहे.

# मोटारसायकल चोरी करणाऱ्या आरोपीस पालघर पोलीसाकडून अटक



**दै.ठाणे जिवनदीप वार्ता**
**पालघर(ऋषीकेश जाधव)**

पालघर पुर्व येथील रेल्वे स्टेशन जवळ पार्कीग करून ठेवलेली मोटार सायकल क्रमांक एमएच-४८-सीई-५८१९ हि कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेले बाबत रतिष अमोल भोपी पालघर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन व पालघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. १४९/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३ (२) प्रमाणे तसेच दिनांक २०/११/२०२४ रोजी पालघर पुर्व रेल्वे स्टेशन जवळ पार्कीग करुन ठेवलेली मोटार सायकल क्रमांक एमएच-४८- सीएफ ५०२२ हि कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेलेबाबत फिर्यादी श्रीमिलन अजित पंजाबी सुंदरम नाका, गिरनार रेसिडेन्सी, पालघर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पालघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. २५४/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३ (२) प्रमाणे असे दोन वेगवेगळे गुन्हे पालघर पोलीस ठाणे येथे दाखल होते. दोन्ही गुन्हयामधील चोरीस गेले वाहनांचा व अज्ञात आरोपीत याचा शोध घेवुन गुन्हा उघडकीस आणणेकरीता बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक, पालघर व अभिजीत धाराशिवकर, उप विभागीय पोलीस अधिकारी, पालघर उप विभाग यांनी केलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे यातील आरोपीत याचा पोलीस निरीक्षक प्रदिप पाटील स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांचे पथकाने गुन्हयाचा समांतर तपास करीत तांत्रीक पध्दतीने तसेच गोपणीय माहितीच्या आधारे शोध घेतला असता .बिजय क्रिष्णा गोष वय ४३ वर्षे व्यवसाय मजुरी सध्या रा. फ्लॅट नं. श्री/३०४, ओम वास्तु, ३ रा माळा, डोंगरपाडा, विरार (प) ता. वसई जि. पालघर, मुळ रा. ग्राम एम-११० वासंती कॉलनी, राऊर केला, उडीसा याने सदरचे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले असुन त्यास विरार परीसरातून ताब्यात घेवुन वरील दोन गुन्हे उघडकीस आणले आहेत. सदरची कामगिरी बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक, पालघर व अभिजीत धाराशिवकर, उप विभागीय पोलीस अधिकारी, पालघर उप विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, प्रदीप पाटील, प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा, पालघर, रविंद्र वानखेडे, संदीप सरदार, दिनेश गायकवाड, व राकेश पाटील, सर्व नेमणूक स्थानिक गुन्हे शाखा, पालघर, यांनी केली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास भगवान आव्हाड, नेमणूक- पालघर पोलीस ठाणे हे करीत आहेत.

## तेथे कर माझे जुळती

# देशभक्त बाबू गेनू

**( १ जानेवारी १९०८- १२ डिसेंबर १९३० )**




परदेशी मालावर बहिष्कार मिठाचा सत्याग्रह व जंगल सत्याग्रह ही तीन सूत्रे होती महात्मा गांधींच्या स्वराज्याच्या लढ्याची ! ही कहाणी आहे देशभक्त बाबू गेनूची,या मुंबईतील गिरणी कामगाराची !!

महाळुंग पडवळ हे खेडेगाव पुण्यापासून ५० मैलावर एका पर्वताच्या कुशीत वसलेले आहे. येथे बाबू गेनू यांचा एक जानेवारी १९०८ रोजी जन्म झाला.

घरच्या गरिबी परिस्थितीमुळे जेमतेम लिहिण्या वाचण्यापलीकडे ते शिक्षण घेऊ शकले नाहीत . त्यांची बुद्धी मात्र अत्यंत तल्लख होती .त्या काळात इंग्रजांच्या विरोधातील चळवळ शिगेला पोहोचली होती .स्वदेशी आंदोलन चालू होते .कळंब गावाहून मंडर गावी आपल्या मित्रांसह ते चालले असता वेगाने लष्करी गाड्या चालवत असलेल्या गोऱ्या वाहकांनी पाच-सहा पादचाऱ्यांना उडून गेले. त्यापैकी काहींची हात मोडले तर काहींचे पाय मोडले . या दुर्घटनेमुळे बाबू गेनू यांनी सदर मोटार गाड्यांवर दगडफेक केली. पण निराशा त्यांच्या पदरी पडली.गरीब परिस्थितीवर मात करण्यासाठी बाबूंचा मोठा भाऊ आईसह मुंबईला आले होते . दोघेही एका गिरणीत मोलमजुरीची कामे करून घरी पैसे पाठवत असत. चार वर्षानंतर त्यांची आई चे आजारपणामुळे निधन झाले . तत्पूर्वी बाबू मुंबईला एका दुकानात नोकरीला लागले होते . काँग्रेस कमिटीच्या काळबादेवी येथील कार्यालयात ते सभासद झाले . स्वयंसेवक म्हणून काँग्रसचे काम करण्याची संधी त्यांना मिळाली होती . मिठाचा सत्याग्रह वडाळा येथे झाला होता त्यामध्ये बाबू सहभागी झाले व स्वदेशीचा प्रचार करू लागले .बाबू गेनूंच्या नेतृत्वाखालील स्वयंसेवकांच्या एका तुकडीने१२ डिसेंबर १९३० रोजी काळबादेवी रस्त्यावरील विदेशी कापड विकणाऱ्या दुकानदारांना विरोध केला व कापड घ्यायला आलेल्या गिरकांना परत पाठविले . मुळजी जेठा मार्केटमध्ये परदेशी मँचेस्टर गिरणीचे कापड घेऊन एक माल ट्रक फोर्ट मार्केटमध्ये जायला निघाला होता . उजव्या हाती तिरंगा झेंडा घेऊन बाबू गेनू वाटेत उभे राहिले . त्वरित प्रिंसेस स्ट्रीट पोलीस ठाण्याला मँचेस्टर गिरणीच्या युरोपीय प्रतिनिधीने ही गोष्ट कळविताच एक पोलीस इन्स्पेक्टर पाच सहा पोलिसांसह उभे राहिले .

त्यांनी ट्रक 'बाबू गेनू यांच्या अंगावरून न्यावा 'असे ट्रक मालकाला फर्मावले. ट्रक चालकाने नकार देतात त्या क्रूर इन्स्पेक्टरने बाबूंना आडवे पाडले व स्वतः ट्रक मध्ये चढून ते अवजड वाहन बाबूंच्या अंगावरून नेले . 'भारत माता की जय ' , 'वंदे मातरम',असे शेवटचे शब्द बाबूंनी उच्चारले आणि क्षणार्धात ते रक्ताच्या थारोळ्यात पडले.

शुद्ध हरपलेल्या बाबूंना दवाखान्यात नेतांनाच वीरमरण आले होते .काँग्रेसचे नेते आणि हजारो नागरिक बाबूंच्या अंत्ययात्रेत सामील झाले होते. परदेशी मालावर बहिष्कार घालतांना वीरमरण येणे हीच बाब बाबू गेनूंच्या आयुष्याच्या सार्थकी लागली .अन्यायाविरुद्ध लढा देणारा ' निःशस्त्र हुतात्मा ' आमचा बाबू गेनू यांच्या निधनामुळे लढण्याची प्रेरणा कित्येक नागरिकांना (अबाल वृद्धांना )मिळाली.धन्य ते बाबू गेनू !



**डॉ. आनंदराव सूर्यवंशी**

# चिंचले प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांना मिळणार हक्काचे छत

## जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम यांनी पुढाकार घेऊन सोडवला प्रश्न

**दै.ठाणे जिवनदीप वार्ता**
**पालघर(प्रतिनिधी) :**

पालघर/ डहाणू तालुक्यातील चिंचले येथील इयत्ता पहिली ते पाचवी पर्यंतची जिल्हा परिषद शाळेची इमारत व एक अंगणवाडी ची इमारत मुंबई वडोदरा महामार्गात येत असल्याने महामार्ग बनवणाऱ्या कंपनीने जिल्हा परिषदेची कुठलीही पूर्व परवानगी न घेता तोडण्यात आली होती. त्यामुळे वर्षभरापासून या शाळेतील विद्यार्थी हे फक्त एका पत्राच्या छताखाली शिक्षण घेत होते. जिल्हा परिषद सदस्य काशिनाथ चौधरी यांनी वर्षभरापासून जिल्हा परिषदेमधील प्रत्येक स्थायी आणि सर्वसाधारण सभेमध्ये पोट तिडकीने हा विषय मांडला होता. नुकतच झालेल्या स्थायी समितीमध्ये देखील हा विषय काशिनाथ चौधरी यांच्याकडून मांडण्यात आला असून या सभेमधे मुलांना शाळा उपलब्ध करून न दिल्यास जिल्हा परिषद येथे आंदोलन करण्याचा इशारा दिला होता.

त्या अनुषंगाने जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम, उपाध्यक्ष पंकज कोरे, जिल्हा परिषद सदस्य काशिनाथ चौधरी, मंगेश भोईर, शैलेश करमोडा, पंचायत समिती सभापती प्रवीण गवळी, डहाणू प्रकल्प अधिकारी सत्यम गांधी, यांनी स्थळ पाहणी केली. यावेळी सदर महामार्ग बनवणाऱ्या कंपनीचे अधिकारी, देखील उपस्थित होते. शाळेच्या नवीन वर्ग खोल्या आणि अंगणवाडी बांधून देणे, त्यासाठी लागणारी किमान दहा गुंठे इतकी जागा व त्यासाठी लागणारा वाढीव खर्च हा अध्यक्ष प्रकाश



निकम यांच्या आदेशाने खास बाब म्हणून मंजूर करण्यात आली असून शाळा व अंगणवाडी चे काम जागा मालकाच्या संमतीने व काही प्रशासकीय बाबी पूर्ण झाल्यावर सुरू करण्यात येईल. ज्या जागी शेड होते त्याच जागेवर मुलांची शाळा आणि अंगणवाडी लवकरात लवकर उभारण्यात येईल. वर्षभर मुलांनी शेड मधे शिक्षण घेतले असून आता त्यांना हक्काची इमारत मिळणार असल्याने पालकांनी सर्व उपस्थित पदाधिकाऱ्यांचे आभार व्यक्त केले.यावेळी शिक्षणाधिकारी सोनाली मातेकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रशेखर जगताप, गटविकास अधिकारी पल्लवी सस्ते तसेच इतर अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

***सदरील प्रकाराबाबत नियमित पाठपुरावा केल्यामुळे जिल्हा परिषद अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांनी घटनास्थळी येऊन या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन हा प्रश्न सोडवल्याबाबत चिंचणी गावातील नागरिकांच्या विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या वतीने मी त्यांचे आभार व्यक्त करतो.***
***जिल्हा परिषद सदस्य काशिनाथ चौधरी.***

# मुरबाडमध्ये पिरबाबा यात्रेला सुरुवात

## तीन दिवस पीर बाबांच्या यात्रेला हजारो भाविक दाखल होणार!



**दै.ठाणे जिवनदीप वार्ता**
**मुरबाड(बाळासाहेब भालेराव) :**

मुरबाड-कल्याण या राष्ट्रीया महामार्गावर असलेल्या उमरोली (बळेगाव) येथील शेकडो वर्षांची परंपरा असलेल्या व नवसाला पवणाऱ्या पिरबाबा यात्रेला १२ डिसेंबर २०२४पासून अर्थात गुरुवार पासुन सुरूवात होत आहे . सदरची यात्रा तीन दिवस चालनार आहे. या यात्रेत हजारो भक्त, भाविक दाखल होतात. तसेच पिरसाई युवा प्रतिष्ठाण तर्फे मोठया प्रमाणात सहकार्य केले जात आहे. त्यामुळे सर्व धर्माचे लोक पिरबाबाचे पुजन करतात याला विशेष महत्व दिले जात आहे. त्यामुळे मुरबाडमध्ये पिरबाबा यात्रेला फार विशेष महत्व आहे. तसेच गुरुवार म्हणुन गावकरी यात्रेचे पुजन करतात. या यात्रेमध्ये विशेषतः कोणताही अनुचित प्रकार घडत नाहि त्यामुळे दिवसेंदिवस पिरबाबाच्या यात्रेचे महत्व वाढत आहे. तसेच टोकावडे पोलिस ठाण्यामार्फत चोख बदोबस्त ठेवण्यात आल्याची माहिती टोकवडे पोलीस सहाय्यक निरीक्षक दिनकर चकोर यांनी दिली आहे.

या यात्रेत गुरुवारी पिरबाबाची पालखी निघते. तसेच गुरुवार म्हणून महिला वर्ग निरंकर उपवास करुन पिरबाबाच्या चरनी नारळाची तळी फोडली जाते. त्यामुळे पिरबाबाच्या यात्रेला संपुर्ण तालुक्यातुन जोरदार प्रतिसाद भाविकांचा मिळत असतो. १२ डिसेंबर २०२४रोजी भव्य पालखी सोहळा,,तसेच मनोरंजनाचे साधन म्हणुन १३ डिसेंबर २०२४ रोजी लोकनाटय (बहुरंगी तमाशा) १४ डिसेंबर २०२४ स्टेप आर्ट डान्स अकॅडमी प्रस्तुत शृंगार नृत्यांचा कार्यक्रम,,१५डिसेंबर२०२४ रोजी सामुदायिक हरिपाठ व महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.या यात्रेसाठी नियोजक पिरसाई युवा प्रतिष्टान, ग्रामस्थ मंडळ उमरोली, भीमज्योत मित्र मंडळ आयोजक,, तरुण तसेच वयोवृध्द व परीसरातील नागरीक यांची टिम यात्रा शांत वातावरणात पार पाडण्यासाठी सज्ज झाली आहे. त्यामुळे मुरबाडच्या पिरबाबाला पाहण्यासाठी तीन दिवसात हजारो भक्त-भाविक दाखल होतील व यात्रेला विशेष महत्व वाढेल अशी माहिती उमरोली (बळेगाव) याा गावचे युवा नेतृत्व महेश पवार यांनी दिली.

## जिल्हा परिषद तसेच सर्व पंचायत समित्यांमध्ये

# मानवी हक्क दिन साजरा



**दै.ठाणे जिवनदीप वार्ता**
**पालघर(प्रतिनिधी) :**

पालघर : पालघर जिल्हा परिषद तसेच सर्व पंचायत समितीमध्ये मानवी हक्क दिन साजरा करण्यात आला.पंचायत समिती पालघर येथे मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी नरेगा अतुल पारस्कर, प्रभारी गटविकास अधिकारी बापूराव नाळे तसेच अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मानवदिन साजरा करण्यात आला.

मानवी हक्क किंवा मानवी अधिकार हे मानवाचे मूलभूत हक्क आहेत.मानवी हक्क हे जागतिक असून सर्वांना समान असतात. हे हक्क उपजत असतात किंवा कायदेशीर असू शकतात. मानवी हक्क प्रमुख हक्क मानले जातात.जीवनाधिकार,यातनांपासून मुक्तता,गुलामगिरीपासून मुक्तता,कोर्ट सुनावणीचा अधिकार, स्वातंत्र्य भाषण.

वैचारिक व धार्मिक स्वातंत्र्य संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्क उच्चायुक्त कार्यालय व मानवी हक्क समिती ह्या दोन संस्था जागतिक स्तरावर मानवी हक्कांच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न करतात.

# दुर्गाडी किल्लयाला छावणीचे रूप

**दै.ठाणे जिवनदीप वार्ता**
**कल्याण(प्रतिनिधी) :**



दुर्गाडी किल्ल्याबाबत न्यायालयाचा निकाल आल्यानंतर हिंदुत्ववादी संघटनांसाह शिवसेनेने किल्ल्यावर जाऊन दुर्गा देवीच्या मंदिरात आरती करत जल्लोष केला. या दरम्यान परिमंडळ ३चे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे याच्यासह सहायक आयुक्त कल्याणजी घेटे हे दुर्गाडी किल्ले येथे पोलिस वर्गासह हजर राहत परिस्थितीवर लक्ष ठेवून होते. यावेळी पोलिसांचा मोठा फौजफाटा किल्ल्यावर असल्याने दुर्गाडी किल्ल्याला छावणीचे रूप प्राप्त झाले होते. याचदरम्यान बाजारपेठ पोलिस स्टेशन चे वरिष्ठ पोलीस निरिक्षक आणि शिवसेना शहर प्रमुख रवि पाटील यांच्या मध्ये तू तु मे मे झाली. याप्रसंगी प्रसिद्धी माध्यामांना पोलीस उपयुक्तांनी प्रतिक्रिया दिली की, न्यायालयाच्या निकालानंतर तणावाचं वातावरण पाहता कल्याण दुर्गाडी किल्ला परिसरात पोलिसांचा मोठा फौजफाटा लावण्यात आला असून अफवांवर विश्वास ठेवू नये. शांतता भंग होऊ नये यासाठी पोलिसांनी काळजी घेतली असल्याचे पोलिस उपायुक्त अतुल झेंडे यांनी सांगितले.

## सिंगापूर गावात उत्साहाच्या वातावरणात

# 'भिंगरी' महोत्सवाची धूम



**दै.ठाणे जिवनदीप वार्ता**
**कल्याण(कुणाल म्हात्रे) :**

मुरबाड तालुक्यातील सिंगापूर गावात भिंगरी महोत्सवाने आनंद आणि उत्साहाचा जल्लोष अनुभवला.

अर्थियन आर्ट फाउंडेशन आणि टायनी टेल्स थिएटरच्या पुढाकाराने आयोजित या बाल महोत्सवाने ग्रामस्थांना एका रंगतदार अनुभवाने न्हाऊन काढले. मुलांसाठी खास आयोजित केलेल्या या दोन दिवसीय सांस्कृतिक महोत्सवाचा मोठ्या उत्साहात समारोप झाला. संस्थेमार्फत सिंगापूर गावात 'नंदन', वैशाखरे गावात 'कुम्बा', आणि मांडवत गावात 'ओनामा' हे लहान मुलांसोबत काम करणारे उपक्रम सुरू असल्याने या महोत्सवात सिंगापूर, वैशाखरे व मांडवत ग्रामस्थांनीही सहभाग घेतला होता. महोत्सवाची सुरवात ऋषिकेश दाभोळकर व प्रतिक्षा खासनिस या थिएटर कलाकारांच्या कथा कथनाच्या सादरीकरणाने झाली.

जीवनातील साध्या प्रसंगांवर आधारित कथा, जीवनावश्यक संदेशमूल्ये असलेल्या नाट्यकृतींनी प्रेक्षकांना अंतर्मुख केले.

त्याचबरोबर, चली कहानी च्या ऋषिकेश प्रधान आणि हर्षा शर्मा या कलाकारांनी सादर केलेल्या नाट्यप्रयोगांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या साध्या पण जीवनदृष्टी देणाऱ्या शैलीने उपस्थितांची वाहवा मिळवली आणि प्रेक्षकांची मने जिंकली.

दिवसाच्या शेवटी सर्व लहान मुले व गावकऱ्यांसाठी चित्रपट प्रदर्शन करण्यात आले. प्रेक्षकांनी शीतल चंद्रप्रकाशात चित्रपटाचा आनंद घेतला. या स्क्रीनिंगमध्ये मुलांसाठी प्रेरणादायक चित्रपट दाखवण्यात आला. ही संपूर्ण प्रक्रिया ग्रामस्थांना नवनवीन अनुभव देणारी ठरली.

दुसऱ्या दिवसाची सुरवात मुलांच्या खेळांनी झाली. प्रेक्षकांनी टाळयांचा कडकडाट करत त्यांना प्रोत्साहन दिले. हे खेळ नेहमी सारख्या खेळांच्या स्पर्धे सारखे न्हवते, हरणे - जिंकणे न्हवते त्यामुळे या अशा खेळांमुळे मुलांमध्ये उत्साह आणि खेळाबद्दल प्रेम निर्माण झाले. शहरी भागाकडून आलेल्या प्रेक्षकांसाठी गाव परिचय फेरी घेण्यात आली, यात विराज घरत यांनी गावातील प्रत्येक वास्तू, घर, प्राणी, जेवण आणि सभोवतालच्या भौगोलिक परिसराचे ऐतिहासिक महत्त्व सांगत, शहरी प्रेक्षकांना ग्रामीण जीवनाचा आनंद दिला.

'भिंगरी' या महोत्सवाने मुलांना आणि ग्रामस्थांना आपल्या पारंपरिक संस्कृतीचा अभिमान वाटावा यासाठी नवी प्रेरणा दिली. फाउंडेशनच्या माध्यमातून सांस्कृतिक वारशाचे जतन आणि ग्रामविकासाला हातभार लावण्याचा प्रयत्न झाला.

## शिक्षक बंधुंनी दिला परंपरेला फाटा

# वडीलांच्या उत्तरकार्याचा खर्च दिला शाळा विकासासाठी



**दै.ठाणे जिवनदीप वार्ता**
**कल्याण(प्रतिनिधी) :**

नुकतेच भिलाली गावाचे जेष्ठ नागरिक व निवृत्त मुख्याध्यापक कै भिमराव साळुंखे यांचे वृध्दपकाळाने निधन झाले. त्यांचे पुत्र राज्य शिक्षक मनवंतराव साळुंखे व माध्यमिक शिक्षक गुणवंतराव साळुंखे यांनी व्यक्तीच्या मृत्युनंतर त्याबाबत गावातील व समाजातील काही वर्षानुवर्षाच्या जुन्या परंपरा व रितीरिवाज यांना फाटा देवुन काही तरी समाज परिवर्तन करण्याचे ठरवुन ते धाडसही दाखविले. त्यांनी आपल्या वडीलांचे दशक्रिया, गंधमुक्ती व उत्तरकार्य हे १० ते १३ दिवस न लांबविता हे सर्व धार्मिक विधी फक्त ५ दिवसात पुर्ण करण्याचा निर्णय घेतला. यामुळे त्यांचा व इतरांचाही वेळ वाचणार आहे. मोठी भाऊबंदकी व गाव जवळ जवळ एक सुतकी असल्याने इतरांनाही त्यांच्याकडचे धार्मिक विधी व इतर कार्य करण्यास मोकळीक मिळणार आहे.तसेच उत्तरकार्याचे भोजन हे संपुर्ण गावाला दिले जाते. त्यावर साधारण १ लाख १० हजाराच्या आसपास खर्च हा निश्चित असतो. एक दिवसासाठी होणारा हा खर्च तसा समाजाचा कोणताही विकास साधत नाही. कै भिमराव साळुंखे यांचा संपुर्ण परिवार हा शिक्षक पेशात आहे. शिक्षक हा समाज परिर्वतन करणारा असल्याने त्यांनी यातुन काही तरी नवे परिवर्तन व समाजाचे भले होईल ते करण्याचे ठरविले. विचाराअंती उत्तरकार्यावर होणारा खर्च म्हणजे १ लाख २५ हजार रुपये रोख हे गावाचे ज्ञानमंदिर संत सोमगीर हायस्कुलला भेट देण्याचा धाडसी निर्णय घेतला.

शाळेची इमारत सुंदर आहे पण शाळेला शालेय पोषण आहार शिजविण्यासाठी किचन शेड नाही. या पैशातुन शाळेत कायम स्वरूपी किचनशेड उभारले जाणार आहे. त्या रकमेचा धनादेश मनोज पाटील, अध्यक्ष श्री स्वामी समर्थ शैक्षणिक व सांस्कृतिक मंडव यांच्या मार्फत शाळेचे मुख्याध्यापक अविनाश पाटील, उप मुख्याध्यापक सुरेश पाटील, विकास पाटील यांना या बंधुंनी प्रदान केला. अनेकांनी साळुंखे बंधुंनी निर्माण केलेल्या या आदर्शाचे समाजातील अनेक मान्यवरांनी मनापासुन स्वागत केले आहे.

महाराष्ट्र शासन

## जलसंपदा विभाग
## ठाणे पाटबंधारे मंडळ, ठाणे
## भातसा धरण व्यवस्थापन विभाग, भातसानगर
## रब्बी हंगाम २०२४-२५
## जाहीर प्रगटन

भातसा मोठा प्रकल्प उजवा मुख्य कालवा किमी १.०० ते ५४.०० व डावा कालवा १.०० ते २.०० मधील लाभक्षेत्रातील व त्यावरील सर्व वितरिका, अधिसूचीत नदी नाल्यावरील लाभधारकांना कळविण्यात येते की, भातसा प्रकल्पात रब्बी हंगाम राबविण्यास पाणीसाठा उपलब्ध असून रब्बी हंगामासाठी पाच पाणी पाळया देण्याचे प्रस्तावीत आहे. रब्बी हंगामात गहू, चना, तूर, कापूस, मिरची व इतर चा-यांच्या पिकांना कालव्याचे प्रवाही / कालव्यावरील नदी- नाल्यांवरील मंजूर उपसा सिंचन योजनाद्वारे सिंचनासाठी पाणी घ्यावयाचे असल्यास पाणी अर्ज मागणी नमुना नं.७ दिनांक १५/१२/२०२४ पूर्वी संबंधीत उपविभागीय/शाखा कार्यालयास सादर करावे. तसेच पाणी अर्ज नमुना ७ अ, ७ ब कोरे फॉर्म संबंधीत शाखा महाळुंगे कार्यालयात विनामूल्य मिळतील.

| अ.क्र. | अर्ज मिळण्याचे कार्यालय / सिंचन शाखा कार्यालय | लाभक्षेत्रातील गावांची नावे |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | अ) भातसा प्रकल्प सहा. अभि.श्रे.-१, भातसा उजवा कालवा उपविभाग, शहापूर जि.ठाणे (भातसा उजवा तीर कालवा कि.मी.२ ते ५४) | शहापूर तालूका :- साजिवली, खुटाडी, सरलांबे, अर्जुनली, खरीवली, तुते. आवरे, कांबारे, कवडास, बामणे, चेरपोली, शहापूर, गोठेघर, वाफे, कळंभे, वेहळेली,खातिवली,भातसई, वासिंद दहागांव भिवंडी तालुका :- सारमाळ, साने, पाली, जांभिवली (प.) पच्छापूर, महाप, शिरगांव, तुळशी, शिरोळा, दाभाड, जाभिवली (को.) चाणे, झिडके, खातिवली,वेढेगांव, वेढेपाडा, सावरोली, (कॉ.), घोटगाव, कासणे, खानीवली, तळवली, कोशोंबी, कांदळी, कळंबोली, वडवली, भोकरी, डोहाळे, उंबरखांड, मोहडूळ, नेवाडे, |
| २ | ब) भातसा प्रकल्प सहा.अभि.श्रे.-१, भातसा उजवा कालवा उपविभाग, शहापूर जि.ठाणे (भातसा डावा तीर कालवा कि मी.१ ते२) | सावरशेत. |
| ३ | क) भातसा नदी उपविभागीय अभियंता,भातसा डावा कालवा उपविभाग, शहापुर,जि.ठाणे | भातसा उजव्या व डाव्या तीरावरील गावे. |

कालवा संचालन कार्यक्रम हा प्राप्त मागणी क्षेत्रानुसार करण्यात येईल.

● नमुना नं.७ चे प्राप्त झालेल्या पाणी अर्जास खालील अटीचे व शर्तीचे अधीन राहून मंजूरी देण्यात येईल.

१. लाभधारकांना त्यांचेकडील थकबाकी पैकी १/३ व चालू हंगामाची अग्रीम पाणीपट्टी भरावी लागेल.
२. पिकाचे मागणीक्षेत्र २० आर चे पटीत असावे,
३. मंजूर उपसा सिंचन योजना धारकांनी(कालवा/नदी-नाले) पाणी अर्ज मंजूर करून घेवूनच उपसा सिंचनाला पाणी वापर करावा.
४. मंजूर क्षेत्रास कालव्याचे पाणी घेण्यात येणारी शेतचारी व विहिरीवरील शेतचारी यामध्ये तीन मीटरचे अंतर असले पाहिजे.
५. लाभक्षेत्रातील कालव्यापासुन ३५ मी पर्यंतच्या विहीरीच्या पाण्याने सिंचित होत असलेल्या नगदी पिकांसाठी (उदा. ऊस, कापूस, केळी व फळबाग इ.) महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम,१९७६ चे कलम ५५ च्या तरतुदीनुसार प्रवाही सिंचनाच्या मुळ दराच्या ५०% दर लागू असेल.
६. पाणी पट्टी न भरणा-या लाभधारकास सिंचनासाठी पाणी देणे या कार्यालयावर बंधनकारक राहणार नाही व त्यांचा पाणीपुरवठा केव्हाही बंद करण्यात येईल व थकबाकीवर शासन निर्णय नियमानुसार द.सा.द.शे.१० टक्के दराने विलंबशुल्क आकारण्यात येईल.
७. कालव्याचे पाणी शेतात नेण्यासाठी असलेली शेतचारी स्वच्छ व व्यवस्थित ठेवण्याची जबाबदारी संबंधीत लाभधारकांची आहे. शेतचारी स्वच्छते अभावी पाणी पुरवठयामध्ये व्यत्यय आल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
८. उडाफ्याचे क्षेत्रास पाणीपुरवठा करण्यात येणार नाही व तसेच लाभधारकांनी मंजूर क्षेत्राचे मर्यादेपर्यंत कालवा व नदी- नाल्याच्या पाण्याचा वापर करावा मंजूरीपेक्षा जादा क्षेत्र भिजल्यास व अनाधिकृतपणे पाणी घेतल्यास नियमाप्रमाणे पंचनामा करून दंडनिय आकारणी करण्यात येईल. मंजूर न केलेल्या क्षेत्रास पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी या कार्यालयावर राहणार नाही.
९. नैसर्गिक आपत्ती व काही अपरिहार्य कारणास्तव किंवा तांत्रिक कारणास्तव पाणी पुरवठा करणे शक्य न झाल्यास व त्यामुळे पिकांचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी या कार्यालयावर राहणार नाही. तसेच महाराष्ट्र पाटबंधारे प्रचलित नियमानुसार शर्ती व अटीचे उल्लंघन झाल्यास लाभधारकास आगावू सुचना न देता दिलेली मंजूरी रद्द करण्यांत येईल व पाणीपुरवठा बंद करण्यात येईल.
१०.भातसा प्रकल्प उजवा कालवा कि.मी. ५४.०० पर्यंत व त्या अंतर्गत असलेल्या वितरण व्यवस्थेद्वारे जिथे सुलभपणे पाणी जावू शकते तिथपर्यंत प्रत्येक पाणी पाळीच्या कालवा संचलन कार्यक्रमानुसार सिंचनासाठी पुच्छ भागाकडून ते मुखाकडील (टेल टु हेड) सिंचनाचे नियमाचे पालन होईल याची खबरदारी लाभधारकांनी घ्यावी. टेल टू हेड या सिंचनाच्या नियमात अडथळा झाल्यास त्यामुळे पिकांचे नुकसान झाल्यास जलसंपदा विभाग जबाबदार राहणार नाही.
११.लाभधारकाने दिवस व रात्री पाणी घेणे बंधनकारक आहे.
१२.काही तांत्रिक अडचणी असल्यास कोणत्याही प्रकारची आगावू सूचना न देता पाणी पाळी पत्रकात बदल करण्याचे अधिकार कार्यकारी अभियंता यांना राहतील.
१३.महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांचे दिनांक २९ मार्च २०२२ चे ठोक जलप्रशुल्क निर्धारण आदेशान्वये किंवा प्रचलीत शासन निर्णयानुसार पाणीपट्टीचे दर आकारण्यात येतील व त्यावर २० टक्के स्थानिक कर आकारण्यात येईल. थकबाकीवर द.सा.द.शे.१० टक्के दराने विलंबशुल्क आकारण्यात येईल. थकबाकीदार लाभधारक व थकबाकीदार पाणी वापर संस्थांना पाणी देणे बंधनकारक राहणार नाही.
१४.कालवा प्रवाह क्षेत्रातील विहीरीवरून औद्योगीक वापरासाठी अथवा पिण्याचे पाण्यासाठी व इतर सिंचनोत्तर वापरलेल्या पाण्याची बिगर सिंचन पाणीपट्टी आकारणी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांचे दिनांक २९ मार्च २०२२ चे ठोक जलप्रशुल्क निर्धारण आदेशान्वये किंवा प्रचलीत शासन निर्णयानुसार करण्यात येईल सविस्तर तपशील पाहण्यासाठी परिपत्रक उपविभाग/ सिंचन शाखा कार्यालयात उपलब्ध आहे.
१५.लाभक्षेत्रातील नदी-नाले यावरील सिंचन क्षेत्रास नियमाप्रमाणे आकारणी करण्यात येईल. तथापी नदीनाले व ओढयात धरणातून / कालव्यातून स्वतंत्रपणे पाणी सोडण्यात येणार नाही. सिंचन कायदयाच्या नियम व अटीचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास मंजुरी दिली जाणार नाही. अथवा दिलेली मंजूरी पुर्व सुचना न देता रद्द करण्यांत येईल.
१६.रब्बी हंगामात दोन पाणी पाळयातील कालावधी सर्वसाधारणपणे २० ते २५ दिवसाचा राहणार असल्याने जमिनीच्या प्रतवारीन्वये पिकाचे नियोजन करण्यांत यावे. हलक्या जमिनीत पर्यायी पाण्याची व्यवस्था असल्याशिवाय भुईमुगासारखो पिके घेवू नये.
१७.वितरिकेस पाणी पाळी मध्ये पाणी चालू असतांना लाभधारक वितरिकेचा दरवाजा वेळी अवेळी कमी जास्त प्रमाणात उघडतात. अशामुळे त्या वितरिकेवरील चालू असलेल्या पाण्याचा विसर्ग कमी जास्त होवून टेल टू हेड त्या सिंचनावर विपरीत परिणाम होतो व त्यामुळे त्या वितरकावरील पिकांना संचलनाप्रमाणे पाणीपुरवठा होत नाही प्रस्तावित पाणीपाळी कालावधीत वाढ होते. जर लाभधारकांनी संचलन कार्यक्रमाप्रमाणे टेल टू हेड रात्रंदिवस शेजपाळीपध्दतीने पिकांना पाणी घेतले तर संभाव्य पाणीपाळीचा कालावधी कमी होवून पाण्याचा अधिकाधिक लाभ होईल.
१८.संपूर्ण प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात शेतक-यांनी कोठेही दारे स्वतः उघडून टेल टू हेड सिंचन प्रकारात अडथळा आणल्यास पाण्याचा नाश तर होतोच शिवाय पाणीपाळी कालावधी वाढतो. त्यामुळे नियोजीत २२ दिवसाच्या पाणी पाळी ऐवजी जास्त कालावधी लागेल. रात्रंदिवस टेल टू हेड सिंचन केल्यास वरील पाणीपाळी कालावधी १५ ते २० दिवसांपर्यंतही कमी होवू शकेल.

भातसा प्रकल्पांतर्गत असलेल्या लाभधारकांनी या बाबत योग्य ते सहकार्य करावे, हि विनंती.

**रब्बी हंगाम २०२४-२५ संभाव्य पाणी पाळी नियोजन**

| अ.क्र. | कालव्यात पाणी सोडण्याचा कालावधी | दिवस | कालवा बंद कालावधी | दिवस |
|---|---|---|---|---|
| १ | २०/१२/२०२४ ते ११/०१/२०२५ | २२ | १२/०१/२०२४ ते १८/०१/२०२५ | ७ |
| २ | १९/०१/२०२५ ते १०/०२/२०२५ | २२ | ११/०२/२०२५ ते १७/०२/२०२५ | ७ |
| ३ | १८/०२/२०२५ ते १२/०३/२०२५ | २२ | १३/०३/२०२५ ते १९/०३/२०२५ | ७ |
| ४ | २०/०३/२०२५ ते ११/०४/२०२५ | २२ | १२/०४/२०२५ ते १८/०४/२०२५ | ७ |
| ५ | १९/०४/२०२५ ते १०/०५/२०२५ | २१ | कालवा पूर्णतः बंद | ७ |
| | | १०९ | | २८ |

टीप :- रब्बी हंगामासाठी पाच पाणीपाळया या प्रस्तावित असून लाभक्षेत्रात हंगामात पाऊस, कालव्याच्या तांत्रिक अडचणी इत्यादीमुळे कालवा चालू बंद कालावधीत पुर्व सुचनेशिवाय बदल संभवतो.

**जा.क्र.२७९३/भाधव्यवि/प्रशा-२/रब्बी जाहिर निवेदन/२०२४**
**विमाका/कोवि/२०२४-२५/२३३**
**दि. १८/११/२०२४**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**भातसा धरण व्यवस्थापन विभाग**
**भातसानगर**

महाराष्ट्र शासन

## जिल्हा जलसंधारण अधिकारी
## मृद व जलसंधारण विभाग, कळवा, ठाणे, यांचे कार्यालय,

पत्ताः कडा वसाहत, सहकार विद्यालयासमोर, कळवा (प.) जि.ठाणे
दूरध्वनी क्र. २५४२८१२७, ई-मेल पत्ताः-eeemilsdnt@gmail.com

**निविदा सूचना क्र. ब-१/३८/जिजअ/सन २०२४-२५**

जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग कळवा-ठाणे मृद व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम (सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत) कंत्राटदाराकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कळवा- ठाणे यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नांव |
|---|---|
| १ | मा. प्रादेशिक जलसंधारण अधिकारी ठाणे यांचे कॅबीन दुरुस्तीचे काम करणे. रु.९९३३२८/- |
| २ | मा.प्रादेशिक जलसंधारण अधिकारी ठाणे यांचे कार्यालयाचे दुरुस्तीचे काम करणे. रु.९९६१९१/- |

१.कोरे निविदा फॉर्म दिनांक १२/१२/२०२४ ते २६/१२/२०२४ या कालावधीत कार्यालयीन वेळेत जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कळवा-ठाणे या कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध असतील.
२.पूर्ण भरलेले निविदा फॉर्म दिनांक १२/१२/२०२४ ते २७/१२/२०२४ दुपारी १४.०० वाजेपर्यंत स्विकारले जातील.
३.कोरे निविदा फॉर्म सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणी प्रमाणपत्र तसेच पॅनकार्ड, जी.एस.टी.नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सादर केल्यानंतर व निविदा शुल्क भरल्यानंतर देण्यात येतील.
४.निम्न स्वाक्षरीकार हे कोणताही किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा हक्क राखून ठेवत आहेत.
५.सविस्तर निविदा सूचना जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग कळवा-ठाणे या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहण्यास उपलब्ध राहील

**जा.क्र. जिजअ (मृवजसं)/ले-१/३३५५/सन २०२४**
**जिल्हा जलसंधारण अधिकारी,**
**मृद व जलसंधारण विभाग,**
**कळवा-ठाणे यांचे कार्यालय**
**दिनांक- ०९.१२.२०२४**

**सही/-**
**(फरीद खान)**
**जिल्हा जलसंधारण अधिकारी**
**मृद व जलसंधारण विभाग,**
**कळवा-ठाणे**

**क्र.जिमाका/ठाणे/जाहि/२०२४-२५/५३**

**प्रतः- उपविभागीय जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण उपविभाग, पालघर यांना नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यासाठी.**
**प्रतः नोटीस बोर्ड प्रसिध्दीसाठी.**

**जलसंपदा विभाग शासन निर्णय क्रमांक निविदा०४१७/ प्र.क्र.२४७/मोप्र-१ दि. ३०/११/२०१८ सोबतचे प्रपत्र**

# एक वर्षाच्या मुलाला घरावरील पाण्याच्या टाकीत फेकून केली हत्या !

**दै.ठाणे जिवनदीप वार्ता**
**शहापूर ग्रामिण(नरेंद्र पाटील)**

वासिंद पासून अवघ्या २ की. मी. अंतरावर असलेल्या कासणे गावात आज सकाळच्या सुमारास एक वर्षाच्या मुलाला घरावरील पाण्याच्या टाकीत फेकून त्याची हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे या घडलेल्या घटनेमुळे गावात एकच खळबळ उडाली असून गाव व परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मृतक मुलाचे वडील जनार्दन भोई हे रात्रपाळीची ड्युटी करून आज सकाळी घरी आल्यानंतर ते आपल्या मुलाजवळ झोपले होते. तर त्यांची पत्नी ही आंघोळीसाठी गेली होती. परंतु आंघोळीवरून त्याची आई आल्यानंतर मुलगा दिसत नसल्याचे पाहून त्याचा त्यांनी शोध घेतला असता तो त्यांच्या घरावरील पाण्याच्या टाकीत मृत अवस्थेत आढळून आला .

सदर, मयत मुलाचे नाव पार्थ संदेश भोई असे असून ही घटना सकाळी साडेपाच-सहाच्या दरम्यान घडली आहे तर या घटनेमुळे कासणे गावात एकच खळबळ उडाली असून सर्वत्र शोक व्यक्त केला जात आहे.

या घटनेची माहिती पडघा पोलीस ठाण्याला मिळताच पोलीस पथक घटनास्थळी दाखल होऊन पंचनामा करत मुलाचा मृतदेह शवविच्छेदन साठी शहापूर उपजिल्हा ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आला तर सायंकाळी उशिरापर्यंत गुन्हा नोंद प्रक्रिया सुरु असल्याचे सांगण्यात आले तसेच या गुन्ह्याचा तपास वेगाने करून लवकरच आरोपीचा तपास करून जेरबंद केले जाईल असे पोलिस सूत्राकडून सांगितले.

# स्काऊट व कब मास्टर व गाईड कॅप्टन व फ्लॉक लीडर प्राथमिक व प्रगत प्रशिक्षणाचे आयोजन

**दै.ठाणे जिवनदीप वार्ता**
**ठाणे(प्रतिनिधी)**

शिक्षण विभाग, माध्यमिक व प्राथमिक, जिल्हा परिषद, ठाणे व ठाणे भारत स्काऊट आणि गाईड जिल्हा कार्यालय, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षणाधिकारी (माध्य) ललिता दहितुले व शिक्षणाधिकारी (प्राथ) बाळासाहेब राक्षे यांचे मार्गदर्शनाखाली बदलापूर हायस्कुल बदलापूर येथे स्काऊट मास्टर व कब मास्टर यांच्या साठी बेसिक व प्रगत प्रशिक्षणाचे आयोजन दिनांक १६ ते २२ डिसेंबर २०२४ या कालावधीत तर ठाणे भारत स्काऊट आणि गाईड जिल्हा संस्था, ठाणे येथे दिनांक १६ ते २२ डिसेंबर २०२४ या कालावधीमध्ये गाईड कॅप्टन व फ्लॉक लिडर प्राथमिक बेसिक प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे तसेच तर दि.२२ ते २८ डिसेंबर २०२४ या कालावधीत गाईड व फ्लॉक प्रगत प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. या बेसिक शिबिरासाठी नोंदणीकृत विद्यालयातील वय वर्ष १८ पूर्ण असलेले शिक्षक यांनी यापूर्वी प्राथमिक ७ किंवा ९ दिवसाचे शिबिर पूर्ण केलेले नाही असे शिक्षक व ज्या शिक्षकांच्या नावे स्काऊट व गाईड करिता वर्ग पाच ते दहा पर्यंतचे क्लब व फ्लॉक लिडरसाठी युनिट सुरू आहे किंवा युनिट सुरू करणार आहे असे तसेच प्रगत प्रशिक्षण करिता बेसिक प्रशिक्षण पूर्ण झालेल्या शिक्षक व शिक्षिकासाठी प्राशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे तरी अधिक माहितीसाठी जिल्हा संघटक स्काऊट श्री. किरण लहाने याना तर गाईड विभाग करिता श्रीमती हेमांगी पाटील जिल्हा संघटक गाईड यांना संपर्क करावा.असे आवाहन जिल्हा संघटक, स्काऊट व गाईड विभाग भारत स्काऊट्स आणि गाईडस जिल्हा कार्यालय ठाणे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# वाळेकर कुटुंबाचा माणुसकीचा हात ; दोन बेघरांना लाभला शास्वत निवारा

**दै.ठाणे जिवनदीप वार्ता**
**अंबरनाथ(प्रफुल केदारे)**

सामाजिक संवेदनेने भारलेली सामाजिक कार्यकर्ते आपली व्यक्तिगत सुखदुःखं देखील समाजाशी वाटून घेतात. वाढदिवसा सारखे आनंदाचे क्षण केवळ आपल्या कुटुंबांसोबत साजरा न करता ते समाजातील उपेक्षित घटकांच्या कामी यावे या भावनेने अंबरनाथचे माजी उपनगराध्यक्ष राजेंद्र वाळेकर यांनी आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने विभागातील दोन निराश्रीत महिलांना कायमस्वरूपी निवारा उभारून दिलाय.

औचित्य होतं राजेंद्र वाळेकर यांचा वाढदिवस. यानिमित्ताने वाळेकर परिवाराने दरवर्षी पडझड झालेल्या गोरगरीब परिवाराला त्यांचे घर नव्याने बांधून देण्याचा संकल्प अमलात आणलाय. बूवापाडा परिसरातील मरियम्मा जगले आणि भीमला गिरीश नायडू या दोन निराधार महिला आपल्या गरिबीमुळे मोडकळीस आलेली आपली घरं दुरुस्त करू शकत नव्हत्या. कदाचित एखाद्या पावसात ही घरे जमीन दोस्तही झाली असती. कुणाचाही भक्कम आधार नसलेल्या या दोन महिलांना त्यांच्या हयातीत आपल्याकडून या घरांचं पुनर्निर्माण होईल हे स्वप्नही धुसर झालं होतं. पण राजेंद्र वाळेकर हे देवदुता प्रमाणे येऊन त्यांनी या दोन निराश्रीत महिलांना पक्की घरे नव्याने उभारून दिली.

राजेंद्र वाळेकर यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने या दोन्ही घरांची आज अंबरनाथ शिवसेना शहर प्रमुख अरविंद वाळेकर यांच्या हस्ते उद्घाटनं झाली. यावेळी या दोन्ही महिलांच्या डोळयांमध्ये कृतज्ञतेचं पाणी तरळत होतं. वाळेकर परिवाराने याआधीही २५ पेक्षा अधिक जीर्ण मंदिरांचा जिर्णोद्धार केलाय तर अनेक नागरिकांना अशा प्रकारे हक्काची नवीन घरं उभारून दिलीप आणि समाजात माणुसकीचे दर्शन घडवलं आहे.

याप्रसंगी अरविंद वाळेकर यांनी सांगितले की समाजात वाढदिवसावर वारेमाप खर्च करण्याची संस्कृती बोकाळतेय, अशा महिलांना दोन नवी घरं देऊन आत्मिक समाधान वाळेकर परिवाराने कमावले आहे.यावेळी अरविंद वाळेकर यांच्या हस्ते या दोन्ही निराधार महिलांना त्यांच्या हक्काच्या घरांच्या चाव्या सुपुर्द करण्यात आल्या. यावेळी त्यांच्यासोबत माजी नगराध्यक्ष मनीषा वाळेकर, निखिल वाळेकर, नीता परदेशी अनिल शेठ, प्रकाश डावरे , राजू शिर्के, बाळा मालुसरे, पद्माकर दिघे, उर्मिला कदम,आणि अनेक शिवसैनिक उपस्थित होते.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - अॅड. जयकुमार ए. रिजवानी